**महाराष्ट्र शासन**

j5.revenue@maharashtra.gov.in

क्र.जमीन ३४२१/६२७/प्र.क्र.२३९/ज-५
महसूल व वन विभाग, १ ला मजला,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:-०७/१०/२०२१.

प्रति,

जिल्हाधिकारी, पुणे

**विषय** :-भूतपूर्व इनाम क्र.६ब (महार वतन) जमिनीचे सक्षम प्राधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय झालेली हस्तांतरणे नियमानुकूल करणेबाबत.

**संदर्भ** :- १) आपले पत्र क्र. पीटीके/कावि/३९९/२०१९, दि.२०/०२/२०१९.
२) आपले पत्र क्र.पीटीई/कावि/३२१/२०१९, दि.२८/०२/२०१९.

महोदय,

विषयांकित प्रकरणी आपल्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ च्या कलम ५ च्या पोटकलम ४ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

....(४) पोट कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, पोट कलम (१) अन्वये परत देण्यात आलेल्या महार वतन जमिनीचा भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व मंजूरीशिवाय आणि राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारीत करील अशी रक्कम प्रदान केल्याशिवाय हस्तांतरीत करता येणार नाही किंवा अंतर व सीमा याद्वारे त्याची विभागणी करता येणार नाही.

" Notwithstanding anything contained in subsection (3), the occupancy of the Mahar Watan land, re-granted under sub-section (1), shall not be transferrable or partiable by meets and bound without the previous sanction of the Collector and except on payment of such amounts as the State Government may, by general or special order determine".

मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ मधील वरील तरतूद ही स्वयंस्पष्ट आहे. यामुळे महार वतन जमिनीचे शेती अथवा बिनशेती प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय हस्तांतरणे झालेली असतील तर अशी हस्तांतरणे नियमानुकूल करण्याबाबत किंवा यासंदर्भातील कोणत्याही स्वरुपाचा शर्तभंग कार्योत्तर मंजूरी देऊन नियमानुकूल करण्याची तरतूद प्रचलित कायद्यामध्ये सद्य:स्थितीत नाही.

वरील तरतूदीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी स्तरावरील प्रकरणे अंतिमत: निकाली काढण्यात यावीत.

आपला,

(श्रीराम यादव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.